ठाणे, शुक्रवार दि. ५ जुलै २०२४ वर्ष : १३, अंक : ६८ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे संपादक : चंद्रकांत भोईटे

टीम इंडियाला घेऊन येणाऱ्या विमानाला विमानतळावर 'वॉटर सॅल्युट' देण्यात आला. ही अनोखी घटना साऱ्यांचेच लक्ष वेधत आहे.



जगविजेत्या टीम इंडियाच्या स्वागतासाठी

अग्रलेख

**हाथरसमधील दुर्दैवी घटना**

उत्तर प्रदेशातील हाथरस येथे स्वतः ला ईश्वराचा दूत मानणाऱ्या भोलेबाबाचा सत्संग आयोजित करण्यात आला होता. या सत्संगात चेंगराचेंगरी होऊन

.....पान २ वर

# नरिमन पॉईंटवर क्रिकेट चाहत्यांचा महासागर

**मरीन ड्राईव्ह परिसरात मोठी गर्दी झाल्याने पोलिसांसह टीम इंडियाला घेऊन जाणाऱ्या वाहनाच्या वाटेत व्यत्यय येत आहे. आपल्या विश्वविजेत्या संघाची एक झलक पाहण्यासाठी मुंबईकर मोठ्या संख्येने एकवटले. टीम इंडियाने वेस्ट इंडिजच्या धरतीवर ऐतिहासिक कामगिरी केली. बार्बाडोस येथे दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून भारतीय संघाने विश्वचषक उंचावला. ट्वेंटी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर भारतीय क्रिकेट संघ मायदेशात परत आला आहे. कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली चॅम्पियन गुरुवारी सकाळी नवी दिल्लीत पोहोचले. भारत १३ वर्षांनंतर विश्वविजेता बनला आहे. टीम इंडियाची मुंबईत विजयी परेड होत आहे. याआधी भारतीय संघाने दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. आयपीएल २०२४ मध्ये चाहत्यांच्या रोषाचा सामना करावा लागलेल्या हार्दिक पांड्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. वानखेडे स्टेडियमवर चाहते 'हार्दिक हार्दिक' अशा घोषणा देताना दिसले. याशिवाय लोकल बॉय असलेल्या रोहित शर्माच्या घोषणांनी स्टेडियम दणाणून निघाले.**

भारतीय क्रिकेट संघाच्या या ऐतिहासिक विजयाबद्दल बीसीसीआयच्या वतीने वानखेडे स्टेडियमवर खेळाडूंच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त लोकांनी हजेरी लावावी यासासाठी आज वानखेडे स्टेडियममध्ये मोफत प्रवेश देण्यात आला आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनचे सचिव अजिंक्य नाईक यांनी ही घोषणा केली आहे. स्टेडियममध्ये प्रथम येणाऱ्यास प्रथम सेवा या तत्त्वावर प्रवेश मिळाला. पावसाच्या सरी बरसत असल्या तरी चॅम्पियन संघाची झलक पाहण्यासाठी चाहत्यांनी क्रिकेटच्या पंढरीत मोठ्या संख्येने हजेरी लावली. (अधिक वृत्त पान २ वर)









## हार्दिक.हार्दिक., ज्या वानखेडेवर हिणवलं त्याच मैदानावर नावाचा जयघोष



टी २० क्रिकेट स्पर्धेत जगज्जेता ठरलेल्या भारतीय संघाचं मुंबईत मोठ्या जल्लोषात स्वागत केलं जातंय. विश्वकप घेऊन हा संघ आज मरिन ड्राईव्ह ते वानखेडे स्टेडिअमवर असा रोड शो करणार आहेत. आपल्या लाडक्या भारतीय संघाचं स्वागत करण्याकरता हजारोंच्या संख्येने मरिन ड्राईव्ह आणि वानखेडे स्टेडिअमवर गर्दी जमली आहे. वानखेडेवरील स्टेडिअमवर तर हार्दिक पांड्याच्या नावाचाही जयघोष सुरू झाला आहे. ज्या वानखेडे स्डेडियमवर आयपीयलच्या दरम्यान हार्दिक पांड्याला हिणवण्यात आलं होतं, त्याच स्टेडिअमवर आता त्याच्या नावाचा जयघोषण करण्यात येत आहे.

भारतीय क्रिकेट संघाने १७ वर्षांनंतर टी-२० विश्वचषक आणि १३ वर्षांनंतर आयसीसी स्पर्धा जिंकली आहे. विजयाचा हा आनंद साजरा करण्यासाठी आज मरीन ड्राईव्ह ते वानखेडे मैदानापर्यंत विजयी मिरवणूक काढण्यात येणार आहे. २००७ रोजी भारताने पहिलाच टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतरदेखील मरीन ड्राईव्ह ते वानखेडे अशी मिरवणूक काढली गेली होती. महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखालील संघाचे स्वागत मुंबईकरांनी मोठ्या जल्लोषात केले होते. रोहित शर्मा त्या संघाचाही भाग होता आणि आजच्या जगज्जेत्या संघाचा तो कर्णधार आहे.

थोडक्यात घडामोडी

## केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या PF वरील व्याजदरात वाढ

नवी दिल्ली - वित्त मंत्रालयाने केंद्रीय सरकारी कर्मचाऱ्यांच्या सामान्य भविष्य निधी (GPF) आणि इतर तत्सम भविष्य निधी योजनांसाठी जुलै-सप्टेंबर तिमाहीसाठी ७.१ टक्के व्याजदर जाहीर केला आहे. वित्त मंत्रालयाच्या या निर्णयामुळे केंद्रीय कर्मचाऱ्यांना आणि इतर संबंधित योजना धारकांना फायदा होणार आहे. व्याजदरात केलेल्या या बदलामुळे त्यांच्या बचत आणि गुंतवणुकीवर सकारात्मक परिणाम होईल. सर्वसाधारण माहितीकरिता हे जाहीर केले जाते की २०२४-२०२५ या वर्षासाठी सामान्य भविष्य निधी आणि इतर तत्सम निधी योजनांच्या सदस्यांच्या क्रेडिटवरील संचयांवर १ जुलै २०२४ पासून ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत ७.१ टक्के दराने व्याज मिळेल. हा दर १ जुलै २०२४ पासून लागू असेल, असे वित्त मंत्रालयाने ३ जुलै रोजी जारी केलेल्या परिपत्रकात म्हटले आहे.

ज्या योजनांना जुलै-सप्टेंबर तिमाहीसाठी ७.१ टक्के व्याज दर मिळेल, त्यामध्ये सामान्य भविष्य निधी (केंद्रीय सेवा), योगदान भविष्य निधी (भारत), अखिल भारतीय सेवा भविष्य निधी, राज्य रेल्वे भविष्य निधी, सामान्य भविष्य निधी (संरक्षण सेवा) आणि भारतीय शस्त्रागार विभाग भविष्य निधी समाविष्ट आहेत. केंद्राने जुलै-सप्टेंबर तिमाहीसाठी लहान बचत योजनांच्या व्याजदरांमध्ये कोणताही बदल केलेला नाही, वरिष्ठ नागरिक बचत योजना (SCSS) साठी व्याजदर ८.२ टक्के असून राष्ट्रीय बचत प्रमाणपत्र (NSC) साठी व्याजदर ७.७ टक्के राहील

# बारवर कारवाई करताना फॅमिली रेस्टॉरंट्सना टार्गेट करू नका

**नवी मुंबई: लेडिज बार, पब, हुक्का पार्लरवर कारवाई करताना फॅमिली रेस्टॉट्ना टार्गेट करू नका अशा सूचना भाजप आमदार गणेश नाईक यांची नवी मुंबई पालिकेला दिल्या आहेत. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर शहरातील अनधिकृत पब, बारचे बांधकाम तोडण्याची भूमिका नवी मुंबई महापालिका आयुक्तांनी घेतली होती. पण गणेश नाईकांच्या विरोधानंतर आता ही कारवाई थांबवण्यात आली आहे.**

शहरात वाढलेले अनधिकृत आणि विना परवाना चालणाऱ्या लेडिज बार, पब, हुक्का पार्लरवर गेल्या काही दिवसात तोडक कारवाई सुरू आहे. महानगरपालिका अतिक्रमण विभागाकडून शहरातील जवळपास ५० पब, बार, हुक्का पार्लरचे अनधिकृत बांधकाम तोडण्यात आले आहे.

## फॅमिली रेस्टॉरंट्सना लक्ष्य केलं जात असल्याचा आरोप



अनधिकृत बारवर कारवाई होत असताना विनाकारण फॅमिली रेस्टॉरंट्सनासुध्दा टार्गेट केले जात असल्याचा आरोप हॉटेल मालकांनी केला. फॅमिली रेस्टॉरंट्सच्या बाहेर उभारण्यात आलेले पावसाळी शेड तोडू नये यासाठी हॉटेल मालकांनी भाजपा आमदार गणेश नाईक यांची भेट घेतली होती. यानंतर गणेश नाईक यांनी फॅमिली रेस्टॉरंट्सवर होणारी कारवाई काही दिवस थांबवावी अशी सुचना महानगरपालिका आयुक्तांना केली आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या कारवाईनंतर महापालिकेची कारवाई

पुण्यामध्ये ड्रंक अँड ड्राईव्ह तसेच ड्रग्ज सापडल्याची घटना घडल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील अनधिकृत पब, बार यांच्यावर बुलडोझर चालवण्याचे आदेश दिले होते. अनधिकृत पब आणि बारमुळे गुन्हेगारीकरण वाढत असल्याचं स्पष्ट झाल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी हे आदेश दिले होते. त्याच आदेशाचं पालन करताना नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई सुरू केली.

## गणेश नाईकांचा कारवाईला विरोध

पण महापालिका आयुक्तांनी सुरू केलेल्या तोडक कारवाईला भाजप आमदार गणेश नाईक यांनी आक्षेप घेत त्याला विरोध केला. सरसकट कारवाई करण्यास त्यांनी विरोध केला असून आधी नोटीस द्या आणि मालकांना स्वतः बांधकाम तोडू द्या अशी भूमिका भाजप आमदार गणेश नाईक यांनी घेतली. त्यानंतर नवी मुंबई महापालिका अतिक्रमण विभागाच्या कारवाईला ब्रेक लागला होता.

सीबीडीपासून दिघ्यापर्यंत असलेल्या लेडीज बार, पबवर बुलडोझर फिरवण्यात आले होते. या तोडक मोहिमेत जवळपास ५० लेडिज बार, पब, हुक्का पार्लरचे अनधिकृत बांधकाम पाडण्यात आले होते. त्यानंतर गणेश नाईकांच्या भूमिकेनंतर महापालिकेने ही कारवाई थांबवली

# ज्येष्ठ नागरिकांनी 'मुख्यमंत्री वयोश्री' योजनेचा लाभ घेण्याचे आयुक्तांचे आवाहन

**पनवेल - मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिकांना कोणत्या ना कोणत्या अपंगत्वाचा सामना करावा लागतो. ही बाब विचारात घेवून केंद्र शासनाने द्रारिद्र्य रेषेखालील संबधित दिव्यांग व दुर्बलग्रस्त ज्येष्ठ नागरिकांसाठी शारिरीक अक्षमतेनुसार सहाय्य साधने, उपकरणे खरेदी करण्याकरिता तसेच मनस्वास्थ केंद्र , योगोपचार केंद्र इत्यादीद्वारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी 'मुख्यमंत्री वयोश्री' योजना सुरू केली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त ज्येष्ठ नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक श्री.मंगेश चितळे यांनी केले आहे.**



**योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे :**

१. आधारकार्ड / मतदान कार्ड
२. राष्ट्रीयकृत बँकेची बँक पासबुक झेरॉक्स
३. पासपोर्ट आकाराचे २ फोटो
४. स्वयं-घोषणापत्र
५. शासनाने ओळखपत्र पटविण्यासाठी विहीत केलेली अन्य कागदपत्रे

## लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकष :-

१ सदर योजनेतंर्गत लाभार्थी व्यक्ती राज्यातील ज्येष्ठ नागरिक ज्यांचे दिनांक ३१.१२.२०२३ अखेर पर्यंत वयाची ६५ वर्षे पूर्ण झालेले असावे.

२ लाभार्थी पात्रतेसाठी जिल्हा प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र किंवा बीपीएल रेशन कार्ड किंवा राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमांतर्गत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत किंवा राज्य/केंद्रशासित सरकारच्या इतर कोणत्याही पेन्शन योजनेअंतर्गत वृद्धापकाळ निवृत्तीवेतन मिळाल्याचा पुरावा सादर करू शकतो.

३ उत्पन्न मर्यादा - लाभार्थ्यांचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु.२ लाखाच्या आत असावे. याबाबतचे लाभार्थ्यांने स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.

४ सदर व्यक्तीने मागील ३ वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारद्वारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केले नसावे. याबाबतचे लाभार्थ्याने स्वयं घोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील. मात्र दोषपूर्ण , अकार्यक्षम उपकरणे इत्यादींच्या बदलीला अपवाद म्हणून परवानगी दिली जाऊ शकते.

५ पात्र लाभार्थ्यांच्या बँकेच्या वैयक्तीक आधार संलग्न बचत खात्यात रु. ३०००/- थेट लाभ वितरण प्रणालीद्वारे वितरीत झाल्यावर सदर योजनेअंतर्गत विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे तसेच मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे देयक (इनव्हाईस) प्रमाणपत्र ३० दिवसांच्या आत संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडून प्रमाणित करुन संबंधित केंद्रीय सामाजिक उपक्रम (CPSU) संस्थेमार्फत विकसित पोर्टलवर ३० दिवसांच्या आत अपलोड करणे आवश्यक राहील. अन्यथा लाभार्थ्यांकडून सदर रक्कम वसूल करण्यात येईल.

६ निवड / निश्चित केलेल्या जिल्हयात, लाभार्थ्यांच्या संख्येपैकी ३० टक्के महिला असतील.

निकषाप्रमाणे लाभर्थ्यांना वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत तपासून पात्र असलेल्या लाभार्थ्यांची यादी जिल्हा समाज कल्याण विभाग यांच्याकडे पाठवण्यात येणार आहेत. याकरिता घरोघरी जाऊन आशा स्वयंसेवकांमार्फत सर्वेक्षण करण्यात येणार आहे. लाभार्थ्यांच्या पात्रतेनुसार समाज कल्याण विभागमार्फत कमाल ३००० रूपये इतके अनुदान प्राप्त होणार आहे. या योजनेअंतर्गत **(पान २ वर)**

पालक आणि उबाठा शहर संघटिका ज्योती पाटील याने केला पर्दाफाश

# दिव्याच्या ठामपा शाळेत विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण पुरवठा



ठाणे - दिवा शहरात नागरी सुविधांचा अभाव असतानाच आरोग्य आणि शैक्षणिक सुविधांचा अभाव जाणवत असतानाच ठाणे पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण पुरवठा करण्यात येत असल्याचे उबाठा महिला शहर संघटिका ज्योत पाटील यांनी करीत पालक आणि उबाठा कार्यकर्त्यांनी गोरखधंद्याचा पर्दाफाश केला.

शिवसेना ठाकरे गटाच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील आणि पालकांनी संयुक्तरित्या ठाणे पालिका शाळेत जेवण पुरवठा करणाऱ्या ठिकाणी धडक देत पुरवठादाराला जाब विचारत निकृष्ट दर्जाचे जेवण लहान मुलांना पुरवून त्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या ठेकेदारावर तातडीने कारवाई करावी अशी मागणी यावेळी पालकांसह ज्योती पाटील यांनी केली.दिव्यातील महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे जेवण पुरवले जावे अशी मागणी यावेळी ज्योती पाटील यांनी केली.

> जेवण अतिशय निकृष्ट दर्जाचे असून दिव्यातील एका गाळ्यात हे जेवण बनवले जाते.त्यासाठी अशुद्ध पाणी वापरले जाते. बेसनचे पीठ व कॉर्नफ्लॉवर वरण घट्ट होण्यासाठी वापरले जाते. तांदूळही अर्धवट शिजलेले असतात. मुलांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे.अनेक पालकांच्या तक्रारी याबाबत आहेत, प्रशासनाने यावर वेळीच कारवाई करावी!
>
> - ज्योती पाटील
> **(उबाठा महिला शहर संघटिका)**

# मुख्यमंत्र्यांच्या नावाने ज्योतिष्याकडून मागितली १० लाखांची खंडणी

ठाणे - राज्याचे मुख्यमंत्री यांचा खास माणूस असल्याचे सांगून आणि भासवत एका जोतिष्याला १० लाखाची खंडणी मागितल्याचा तक्रारअर्ज ज्योतिष्य परशुराम भट्टर यांनी ठाणे गुन्हे शाखा पोलीस उपायुक्त डॉ. शिवराज पाटील याना दिल्याची माहिती तक्रारदाराने दिली.

ठाणे रेल्वे स्टेशनसमोर परशुराम भट्टर हे ज्योतिष्य कुंडली पाहण्याचा व्यवसाय करतात. त्यांच्याकडे बंगळुरू येथील श्रीनिवास विठ्ठल शेट्टी हे येत होते. त्यांच्या परिचयाचे सुरेश व्यंकटेश रेड्डी हे देखील भट्टर यांच्याकडे येत होते. भट्टर यांनी दिलेल्या सल्ल्यामुळे रेड्डी यांची भरभराट होत असल्याने भट्टर यांना चारचाकी वाहन घेण्यासाठी काही रक्कम भेट म्हणून दिली होती. कालांतराने रक्कमेसाठी तगादा लावण्यात आला. भट्टर यांनी रेड्डी याना ३० लाखाचे तीन धनादेश दिले. दोन धनादेश वटले मात्र पैसे आपल्या खात्यात आले नसल्याचा कांगावा केला. उर्वरित १० लाख रुपये पनवेल येथील नगरसेवक संतोष शेट्टी याना देण्याचे सांगितले. भट्टर यांनी ५ लाखाचे दोन चेक शेट्टी याना



पोलीस उपायुक्तांकडे तक्रार अर्ज

दिले. दरम्यान ५ जून रोजी अज्ञात इसमाने तक्रारदार भट्टर यांच्या दुकानात जाऊन मुख्यमंत्र्यांच्या नावाने खूप कमविले. प्रकरण मिटविण्यासाठी १० रुपये दे नाहीतर वाट लावीन अशी धमकावत खंडणी मागितली. या प्रकरणी तक्रारदार यांनी गुन्हे शाखा पोलीस उपायुक्त डॉ शिवराज पाटील याना तक्रारअर्ज देत कारवाईची मागणी केल्याची माहिती भट्टर यांनी दिली.

सिंगल यूज प्लॅस्टिकबंदी मोहिम....दुकानांची झाडाझडती सुरू

# पालिका पथकाने ३६९ आस्थापनांकडून १३९.५६ किलो प्लास्टिक जप्त-९५ हजाराचा दंड वसुली

ठाणे - ठाणे महानगर पालिकेच्या प्रदुषण नियंत्रण विभाग आणि महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या माध्यमातून सुरु करण्यात आलेल्या मोहिमेत गुरुवारी सिंगल यूज प्लॅस्टिक बंदीबाबत केलेल्या कारवाईत पथकाने ठाणे पालिका परिक्षेत्रातील दिवा,उथळसर, कळवा, नौपाडा-कोपरी, वागळे इस्टेट, लोकमान्य-सावरकर नगर, वर्तकनगर प्रभाग समितीच्या हद्दीतील ३६९ आस्थापनांना भेटी देवून १३९.५६ किलो सिंगल यूज प्लास्टिक जप्त करण्यात आले असून यापोटी एकूण ९५ हजार १०० रुपये इतका दंड वसूल करण्यात आल्याची माहिती पालिका सूत्रांनी दिली.

गुरुवारी संयुक्त कारवाईत ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील दिवा प्रभाग समितीअंतर्गत १७ आस्थापनांना





भेटी देवून २३ किलो सिंगल यूज प्लास्टिक जप्त करुन एकूण ४ हजारांचा दंड वसूल करण्यात आला. कळवा प्रभाग समितीअंतर्गत ५५ आस्थापनांना भेटी देवून ३२.२६ किलो प्लास्टिक जप्त करुन एकूण १८ हजारांचा दंड वसूल करण्यात आला. उथळसर प्रभाग समिती अंतर्गत ३० आस्थापनांना भेटी देवून १० किलो **(पान २ वर)**

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## हाथरसमधील दुर्दैवी घटना

उत्तर प्रदेशातील हाथरस येथे स्वतःला ईश्वराचा दूत मानणाऱ्या भोलेबाबाचा सत्संग आयोजित करण्यात आला होता. या सत्संगात चेंगराचेंगरी होऊन त्यात १२१ जणांचा बळी गेल्याची घटना नुकतीच घडली आहे. तर अनेक लोक जखमी झाले. भोले बाबा हे हाथरस आणि आजूबाजूच्या परिसरात धर्मोपदेशक म्हणून प्रसिद्ध आहेत. तसेच, दीर्घकालीन आजार बरे करणे, लोकांच्या समस्या सोडवणे आदी गोष्टींमुळे त्यांच्याकडे अनुयायांची गर्दी वाढत आहे. हे भोलेबाबा मृत व्यक्तींना जिवंत करण्याचा दावा करतात, पण सदर घटना घडल्यापासून हे ईश्वराचे तथाकथित दूत फरार झाले आहेत. जगात असे अनेक बाबा – बुवा आहेत, तसेच देवी, माता आहेत. लोक अशा भोंदूच्या नादी लागतात आणि अनेक संकटांना तोंड द्यावे लागते. आपले स्वत्व गमावून दुसऱ्याला शरण जाणे ही मानसिकता वाईटच ! या भोले बाबांनी २००० साली असाच चमत्कार करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु, तेव्हा त्यांना अटक करण्यात आली होती. मृत झालेल्या एका मुलीला जिवंत करण्यासाठी त्यांनी तिचा मृतदेह ठेवून घेतला होता. परंतु, नंतर हा खटला बंद करण्यात आला. १९९० च्या दशकात उत्तर प्रदेश पोलीस खात्यातून बाहेर पडल्यानंतर कासगंज येथील कॉन्स्टेबल सूरज पाल हे धर्मोपदेशक बनले. त्यांनी मोठ्या प्रमाणात अनुयायी गोळा केले. दलित कुटुंबे, मजूर, गवंडी, शेतमजूर आदी आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या लोकांमध्ये या बाबांचा दबदबा आहे. भोले बाबा हे दलित कुटुंबातील असल्याने तळागाळातील मागासवर्गीय लोक त्यांच्याकडे आकर्षित होतात. विशेष म्हणजे ते कोणतीही दक्षिणा किंवा प्रसाद मागत नाही. खोटे बोलू नका, मांस–मासे–अंडी खाऊ नका, मद्यपान करू नका, असे ते त्यांच्या अनुयायांना सत्संगातून सांगतात. सत्संगाच्या शेवटी भोले बाबा म्हणाले की, आज प्रलय येणार आणि मग खरंच प्रलय आला, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे. या सत्संगाला ४० ते ७० वयोगटातील नागरिक उपस्थित होते. भोले बाबांच्या पायाची धूळ अंगावर किंवा डोक्यावर लावली तर सर्व आजार बरे होतात, असा त्यांच्या अनुयायांचा विश्वास आहे. हे भोलेबाबा समाजात अंधश्रद्धा पसरवत असल्याचे दिसते. पण यांच्यावर कारवाई होत नाही, अशी व्यवस्था आपल्या देशात आहे. त्यामुळे अशा भोंदूचे फावते. सत्संग कार्यक्रमातून भोले बाबा निघाले तेव्हा त्यांच्या पायाची माती डोक्याला लावण्याच्या अंधश्रद्धेपायी गर्दी झाली होती. परिणामी चेंगराचेंगरी झाली आणि दुर्घटना घडली. सलग सातवेळा या भोलेबाबाच्या सत्संगाला उपस्थित राहिला तर तो व्यक्ती सेवेदार होऊ शकतो. सेवेदाराचा खास गुलाबी ड्रेस असतो. स्त्रिया पुरुष गुलाबी रंगाचा गणवेश घालतात. भोलेबाबाच्या सत्संगात अंधश्रद्धेपायी भाविकांची चेंगराचेंगरी होऊन त्यात १२१ जणांचा बळी गेला आहे. मृतदेहांचे खच पाहून एका पोलिसाला हृदयविकाराचा झटका येऊन तो मृत्युमुखी पडला. पण भोलेबाबाला कसलेच दुःख झालेले नाही. आता या प्रकरणावर भोलेबाबा उर्फ नारायण सरकार हरि याने प्रतिक्रिया दिली आहे की, जे काही घडले त्याचा मला खेद वाटतो आहे. परंतु असे म्हणून मृत पावलेले लोक पुन्हा परत येणार नाहीत. किंवा मृतदेह जिवंत करण्याचा दावा करणारा भोलेबाबा दुर्घटनेतील कुणा मृत व्यक्तींना जिवंत करणार नाही. अशा अचाट दावे करणाऱ्या भोंदू मंडळींच्या भजनी लोकांनी लागू नये हेच खरे ! भोले बाबांवर अंधश्रद्धा ठेवून या कार्यक्रमाला हजारो लोक आले होते. भोले बाबांनी सत्संगस्थळ सोडल्यानंतर त्यांचा स्पर्श झालेली माती गोळा करण्याकरता गर्दी जमली. त्यासाठी लोक जमिनीवर पसरले होते. यामुळे चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीत भाविक जवळच्या नाल्यात पडले आणि दुर्घटना घडली. दुर्घटना घडल्यानंतर भोलेबाबांनी एक पत्रक काढून, काही समाजकंटकांमुळे चेंगराचेंगरी झाली, असे म्हटले आहे. या दुर्घटनेप्रकरणी कार्यक्रमाच्या आयोजकांविरुद्ध गुन्ह्याची नोंद झाली आहे. तसेच दुर्घटनेतील जखमींवर उपचार सुरु आहेत. भोलेबाबाची एवढी प्रसिद्धी आहे की, त्यांना पाहण्यासाठी काही महिला खांबावर चढल्या होत्या. भोलेबाबांना पाहण्यासाठी ही गर्दी झाली. ही घटना घडताच सिंकंदररावचे पोलीस प्रमुख आशिष कुमार यांनी वर्तविली. आग्रा येथील अतिरिक्त पोलीस महासंचालक आणि अलिगडच्या विभागीय आयुक्तांनी घटनास्थळी धाव घेतली असून चौकशी सुरू केली आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मृतांच्या नातलगांना २ लाख रुपये व जखमींना ५० हजारांचे सानुग्रह अनुदान जाहीर केले आहे. पंतप्रधान साहाय्यता निधीमधूनही मृतांच्या नातलगांना २ लाख तर जखमींना ५० हजारांची मदत पंतप्रधान कार्यालयाने जाहीर केली आहे. याप्रकरणी उत्तरप्रदेशच्या मुख्यमंत्री आदित्यनाथ योगी यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत. या सत्सगाचा आयोजक नारायण साकार हरी उर्फ भोले बाबा अद्यापही फरार आहे, असे उत्तर प्रदेशच्या पोलिसांनी म्हटले आहे. भारतीय न्याय संहिता , २०२३ च्या कलम १०५, ११०, १२६, १२६ (२), २२३ आणि २३८ अंतर्गत भोलेबाबाचे मुख्य सेवेदार असलेले देवप्रकाश मधुकर आणि चेंगराचेंगरी झालेल्या धार्मिक कार्यक्रमाच्या इतर आयोजकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## जाहिरातीसाठी एकमेव दै. 'महाराष्ट्र सम्राट'

- ☆ मिळकट नोटीस
- ☆ हस्तांतर करार नोटीस
- ☆ नोंदणी न्यास नोटीस
- ☆ निविदा जाहिरातीसाठी
- ☆ तहसिल जाहीरनामा
- ☆ कामगार न्यायालय नोटीस
- दिलेल्या जाहिरात त्वरित प्रसिद्ध करणेसाठी एकमेव दैनिक महाराष्ट्र सम्राट
- शुभेच्छा / वाढदिवस जाहिरातीसाठी महाराष्ट्रातील प्रभावी दैनिकांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र सम्राट

संपर्क : दै. महाराष्ट्र सम्राट, विक्रीकर कार्यालय शेजारी, गेट नं. ४, कलेक्टर कंपाऊंड, कोर्टनाका, ठाणे (प.) ४००६०१
☎ 022 - 25379944 , +91 - 9167957771


* पीआरबी कायद्यानुसार सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीनकक्षेच्या आधीन राहिल. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या / लेख / जाहिराती यांची जबावदारी संबंधित वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यात राहिल.)

महाराष्ट्र सम्राट
*DISCLAIMER: Readers are requested to verify and make appropriate enquires to satisfy themselves about the veracity of an advertisement before responding to any published in this newspaper. The publisher & the owner of this newspaper, does not vouch for the authenticity of any advertiser's products and/ or services. In no event can the Owner, Publisher, Printer, Editor, Director's, Employees of this newspaper/ company be held responsible/liable in any manner whatsoever for any claims and/or damages for advertisments in the newspaper.

# हा वर्ल्ड कप फक्त भारतीय संघाचा नाही तर...

## रोहितने एका वाक्यात जिंकली सर्वांची मनं

मुंबई : भारतीय संघाची विक्टरी परेड झाली आणि त्यानंतर वानखेडे स्टेडियममध्ये एक खास सोहळा झाला. या सोहळ्यात रोहित शर्माने चाहत्यांच्या साक्षीने एक वाक्य म्हटलं. या एका वाक्याने रोहित शर्माने सर्वांची मनं जिंकली.

भारतीय संघ खास बसमधून विक्टरी परेड करत होता. नरिमन पॉइंट ते वानखेडे स्टेडियम हा परीसर चाहत्यांनी फुललेला होता. त्यानंतर भारतीय संघ वानखेडे स्टेडियममध्ये दाखल झाला. त्यावेळी रोहित शर्माची एक खास मुलाखत घेण्यात आली. त्यावेळी रोहित शर्माने आपली भावना व्यक्त केली. या खास मुलाखतीमध्ये रोहित शर्मा फक्त एक वाक्य बोलला आणि त्याने सर्व चाहत्यांनी मनं यावेळी जिंकली.



रोहित शर्मा वानखेडे स्टेडियममध्ये म्हणाला की, जेव्हापासून आम्ही वर्ल्ड कप घेऊन भारतामध्ये दाखल झालो आहोत, तेव्हापासून अविस्मरणीय अनुभव आम्हाला येत आहेत. चाहत्यांनी मनापासून आमच्यावर अलोट प्रेम केलं आहे. खरं तर हा वर्ल्ड कप भारतीय संघाचा नाही तर ही ट्रॉफी आपल्या संपूर्ण देशाची आहे. मी सर्वात सुदैवी माणूस आहे. कारण मला असा चांगला संघ लाभला. या संघाने अथक मेहनत घेतली. आज सकाळी आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली आणि आमच्या सर्वांसाठी हा सुखद अनुभव होता. भारतीय संघाच्यावतीने मी संपूर्ण देशाचे आभार मानतो. कारण त्यांनी नेहमीच आम्हाला पाठिंबा दिला. कधीही त्यांनी आम्हाला निराश केले नाही. त्यामुळे या विश्वविजयात देशाचा आणि चाहत्यांनचाही महत्वाचा वाटा आहे. रोहित शर्माने हा वर्ल्ड कप फक्त भारतीय संघाचा नाही, तर संपूर्ण देशाचा आहे, असे म्हणत सर्व चाहत्यांची मनं जिंकली. कारण एखाद्या कर्णधाराने संघाचे कौतुक केले असते. पण रोहितने यावेळी फक्त संघाचे, खेळाडूंचे कौतुक केले नाही. रोहित यावेळी देशाचे आणि देशवासियांचे आभार मानायला विसरला नाही.

रोहित शर्मा हा असा एकमेव खेळाडू आहे, जो २००७ साली झालेल्य वर्ल्ड कपच्या विजयातही होता. त्यानंतर २०२४ साली तर रोहित हा कर्णधार होता. पण या दोन वर्ल्ड कपमध्ये असलेला रोहित हा एकमेव भारताचा खेळाडू ठरला आहे.



आज सकाळी राजधानी दिल्लीत दाखल झाल्यानंतर भारतीय संघ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीसाठी ७ लोककल्याण मार्ग येथील पंतप्रधानांच्या निवासस्थानी पोहोचला. तेथे नरेंद्र मोदी आणि विश्वविजेत्या भारतीय क्रिकेट संघातील खेळाडूंची भेट झाली. यावेळी पंतप्रधानांनी अनौपचारिक गप्पांमध्ये भारतीय खेळाडूंना स्पर्धेदरम्यानचे अनुभव विचारले. याचदरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय संघातील फिरकीपटू युझवेंद्र चहलकडे इशारा करत 'हाच का तो भारतीय क्रिकेट संघामधील खोडकर मुलगा',अशी विचारणा केली. त्यावेळी तिथे उपस्थित असलेल्यांमध्ये एकच हशा पिकला.

# बेलापूर व तुर्भे विभागात ९ अनधिकृत रेस्टॉरंट, बार व पबवर तोडक कारवाई





नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत व वाढीव बांधकाम करणाऱ्या हॉटेल / बार आणि रेस्टॉरंट / लेडीज बार / पब / लॉज / हुक्का पार्लर यांच्यावरील कारवाई तीव्रतेने राबविण्यात येत असून यापूर्वी अशा प्रकारच्या ५९ व्यावसायिकांवर यापूर्वी कारवाई करण्यात आलेली आहे. ही कारवाई महापालिका आयुक्त यांच्या निर्देशानुसार व अतिक्रमण विभागाचे उपआयुक्त डॉ.राहुल गेठे यांच्या नियंत्रणाखाली तशाच तीव्रतेने राबविण्यात येत आहे.

या कारवाई अंतर्गत ३ जुलै रोजी रात्रीपासून ४ जुलैच्या पहाटेपर्यंत तोडक कारवाई करण्यात आली. यामध्ये बेलापूर विभाग कार्यक्षेत्रातील (१) अरुण बार अँड रेस्टॉरंट, (२) साई दर्शन बार अँड रेस्टॉरंट, (३) रेन फॉरेस्ट पब अँड लॉन्च, (४) टर्निंग पॉईंट बार अँड रेस्टॉरंट, (५) सेंटर पॉईंट बार अँड रेस्टॉरंट यांच्यावर कारवाई करण्यात आली. तसेच तुर्भे विभाग कार्यक्षेत्रातील (१) कल्ट पब अँड लॉन्च, (२) ब्लु स्टार बार ( लेडीज बार ), (३) धनराज बार ( लेडीज बार ), (४) करिश्मा बार ( लेडीज बार) या हॉटेल – रेस्टॉरंट / बारवरही कारवाई करण्यात आली.

या धडक मोहिमेसाठी सहाय्यक आयुक्त श्री. शशिकांत तांडेल, डॉ. अमोल पालवे, श्री.भरत धांडे व त्यांचे अधिनस्त अतिक्रमण विभागाचे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. यापुढेही अशीच तीव्र कारवाई करण्यात येणार आहे.



ठाणे –व्हॉईस ऑफ मीडिया'च्या वतीने दैनिक, साप्ताहिक, टीव्ही, रेडिओ या वेगवेगळ्या विभागांतील विषयाला घेऊन राज्यातील हजारो पत्रकार चार जुलै रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा तंबू ठोकणार आहेत. शासन, राज्य सरकार छोट्या छोट्या दैनिकांना, साप्ताहिकांना सावत्रपणाची वागणूक देत आहे, हे मागच्या लोकसभा निवडणुकीमध्ये दिसून आले. येत्या विधानसभा निवडणुकीला याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी 'व्हॉईस ऑफ मीडिया' हजारो पत्रकारांना घेऊन रस्त्यावर उतरत आहे. 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे, महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के, मुख्य संयोजक तथा कार्याध्यक्ष योगेंद्र दोरकर, साप्ताहिक विंगचे प्रदेशाध्यक्ष, संयोजक साप्ताहिक विंगचे कय्युम अब्दुल रशीद,वामन पाठक,रोहित जाधव यांनी या आंदोलनात सर्व पत्रकार बांधवांनी, 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे पदाधिकारी, सदस्य यांनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते , जिल्हाधिकारी कार्यालया समोर काळ्या फिती लावून धरणे आंदोलन करण्यात आले आहे. (छाया , मनोज सिंह)

## ज्येष्ठ नागरिकांनी 'मुख्यमंत्री वयोश्री' योजनेचा लाभ घेण्याचे आयुक्तांचे आवाहन

(पान १ वरून) पात्र वृध्द लाभार्थ्यांना त्यांच्या शारिरीक असमर्थता , दुर्बलतेनूसार सहाय्यभूत साधने उदाहरणार्थ चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड, स्टिक व्हिल चेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नि–ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर इत्यादी उपकरणे खरेदी करता येणार आहेत. तसेच राज्य शासनाद्वारे नोंदणी करण्यात आलेल्या योगोपचार केंद्र ,मनस्वास्थ केंद्र, मनशक्ती केंद्र, प्रशिक्षण केंद्र यामध्ये सहभागी होता येईल.

## पालिका पथकाने ३६९ आस्थापनांकडून १३९.५६ किलो प्लास्टिक जप्त–९५ हजाराचा दंड वसुली

(पान १ वरून) सिंगल यूज प्लास्टिक जप्त करुन ७ हजारांचा दंड वसूल करण्यात आला. नौपाडा कोपरी प्रभागसमिती अंतर्गत ४४ आस्थापनांना भेटी देवून ११ किलो प्लास्टिक जप्त करुन ८ हजार ५०० इतका दंड वसूल करण्यात आला. वागळे इस्टेट प्रभाग समिती अंतर्गत ४९ आस्थापनांना भेटी देवून ५ किलो सिंगल यूज प्लॅस्टिक जप्त करुन ६ हजार ६०० इतका दंड वसूल करण्यात आला. लोकमान्य सावरकरनगर प्रभाग समिती अंतर्गत १८ आस्थापनांना भेटी देवून एकूण ७ किलो सिंगल यूज प्लास्टिक जप्त करुन एकूण ३ हजार ५०० रुपये इतका दंड वसूल करण्यात आला. वर्तकनगर प्रभाग समितीअंतर्गत ७८ आस्थापनांना भेटी देवून २.७ किलो सिंगल यूज प्लास्टिक जप्त करुन ९ हजार दंड वसूल करण्यात आला. माजिवडा मानपाडा प्रभागसमिती अंतर्गत ७८ आस्थापनांना भेटी देवून ४८.६ किलो सिंगल यूज प्लास्टिक जप्त करुन एकूण ३८ हजार ५०० इतका दंड वसूल करण्यात आला असल्याची माहिती ठाणे महापालिकेच्या मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान यांनी दिली.

## लाडकी बहीण योजना ही ठराविक महिला वर्गाची मतं विकत घेण्यासाठीच शासनाने काढली आहे का?असा प्रश्न उपस्थित होतो..

# अर्ध्या बहिणी लाडक्या आणि अर्ध्या बहिणी नावडत्या ? हे शासनाचे असमानतेच धोरण आहे.

गोरगरीब महिलांना शासनाच्या पूर्वीच्या ज्या कल्याणकारी योजना आहेत, त्यामध्येच भरीव तरतूद करून दिली पाहिजे. त्यांना आर्थिक दृष्ट्या,त्यांचं कुटुंब सक्षम केलं पाहिजे. घरातील कर्त्या व्यक्तीला रोजगार देणं हे पंधराशे रुपये पेक्षा केव्हाही चांगलंच राहील! सत्तेत बसलेले गद्दार भाऊ कुटुंबातील कर्त्या व्यक्तीला (महिला/पुरुष) कायमस्वरूपी रोजगार देण्यास असमर्थ ठरत आहेत.

...आणि निवडणुकीच्या तोंडावर पंधराशे रुपये देऊन स्वतःची गद्दारी मिटवण्याचा प्रयत्न करीत असून भविष्यातील राजकीय बेरोजगारी न होण्याचा हा भगीरथ प्रयत्न आहे

शासन रोजगार देण्याच्या दृष्टीने उपाययोजना करत नाही,मात्र निवडणुकीच्या तोंडावर काही ठराविक महिलांची मतं मिळावीत यासाठी एक प्रकारे ही सरकारी लाचच देत आहेत का? असा प्रश्न पडतो!



जर आपल्या महिला भगिनींना खरंच भाऊ म्हणून मदत करायची असेल तर त्यांच्या घरातील कर्त्या बेरोजगार युवकाला नोकरी, त्यांच्या शाळा कॉलेजात आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या सर्व पाल्यांना सर्व प्रकारचे शिक्षण नोकरी लागेपर्यंत मोफत आणि शेतकरी असलेल्या कुटुंबाला बी बियाणे खते मोफत देण्यात यावी.

ज्याप्रमाणे ठाणे महापालिका आर्थिक संकटात असताना आपल्या अधिकाराचा आणि पदाचा वापर करून हजारो कोटीचे शासकीय निधी आपल्या चमच्यांना आणि माजी नगरसेवकांच्या प्रभागात दुबार तिबार कामांसाठी देऊन त्यांचे आर्थिक पुनर्वसन आणि आगामी निवडणुकां साठी त्यांना सक्षम करण्याकरिता प्रयत्न केले ना? त्याचप्रमाणे महिलांसाठी प्रामाणिक प्रयत्न का करत नाही.?

सरकारने महिला वर्गात भेदभाव करू नये, सरसकट सर्व महिलांना एकतर या योजनांचा लाभ द्यावा! महाराष्ट्राच्या भगिनींमध्येच सरकार भेदभाव करत असेल तर सत्तेमध्ये बसलेले भाऊ हे फक्त निवडणुकीत मतांचा खाऊ खाण्याचा विचार करत आहेत.

**– संजय घाडीगांवकर**

Public Trusts Registration Office, Thane
Address: 1st Floor,Lilly Apt, Parsi Agari Lane
Tembi Naka Thane (w)- 400601

### Public Notice

Service Request Number : THN01364/18/24
Inquiry/case No. : ACC/III/271/2024
Name of the Trust : MAYALAY CHARITABLE TRUST
**Address of the Trust :** MAYALAY CHARITABLE TRUST, FLAT NO. 906, BLDG NO. 26, REGENCY SARVAM., TITWALA EAST, THANE, KALYAN, AMBIVALI TARF VASUNDRI
**Name of the Applicant :** SHUBHANGI HANUMANT JADHAV

To
**All Concerned having interest**
Whereas in the above application under section 19 of the Maharashtra Public Trust Act 1950, an enquiry is to be made under section 19 of the said Act, on the following points by the Asst. Charity Commissioner, Thane.

1. Whether a Trust in the respect of the above exists and whether such Trust is a public Trust?
2. Whether any of the following properties are the properties of such Trust?

**Movable Property**

| SR | Property Details | Estimated Value |
|---|---|---|
| 1 | Cash In Hand | 1000.00 |

**Value of Movable Property :** Rs. 1000/- Only
(In Words Rs. One Thousand Only)

**Immovable Property**

| SR NO | Town Or Village | CS Or Municipal Or Survey No | Area | Assessment Or Judiciary | Tenure Or Nature | Estimated Value |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nil | Nil | Nil | Nil | Nil | 0.00 |

Value of Immovable Property : Rs. 0/- Only
(In Words Rs. Only)

This is to call upon you to submit your objections or any evidences if any, at the above office address within 30 days from the date of publication of this notice in written. If not received anything within given period, the inquiry would be completed & necessary orders will be passed. If no objections are received within the stipulated time then further inquiry would be completed and necessary orders will be passed.

This notice given under my hand and seal of the Office on this date 26/06/2024.

Stamp

Sign/-
Superintendent
Public Trusts registration Office,
Thane

### ग्राहक तक्रार निवारण आयोग ठाणे, जिल्हा ठाणे यांचे कार्यालय

जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, दुसरा मजला, रुम नं.२१४, ठाणे (प) ४००६०१
E-mail-confo-th-mhnic.in फॅक्स २५३९०३२१ दूरध्वनी (०२२) २५३४४०६९.

जाक्र. जिग्रातनिआ/ठाणे/आस्था/२०२४/१२७७ दिनांक:–४/०६/२०२४

**Under the Consumer Protection Act, 1986**

Complaints / **तक्रारदार**

| | | | |
|---|---|---|---|
| CC/547/2019 | MR. SATISH GOVIND GUDADHE | CC/548/2019 | MR. SATISH GOVIND GUDADHE |
| CC/549/2019 | MR. SATISH GOVIND GUDADHE | CC/550/2019 | MR. SATISH GOVIND GUDADHE |
| CC/551/2019 | MR. SATISH GOVIND GUDADHE | | |

Opposite Party/ **विरुध्द पक्ष**

1. M/S VISION E MALL CORPORATION MR. SHANKAR GUPTA MANAGING DIRECTOR VMC VRUNDAVAN GARDEN, KRISHNA BUILD CON CORPORATION, SHOP NO 26/27, DEVASHREE GARDEN COMMERCIAL COMPLEX, NEAR RUTU PARK, RW SAWANT MARG, OPP MAJIWADA FLYOVER, THANE WEST 400601 THANE. MAHARASHTRA
2. MR. MADHUKAR BHAGWAN PADWAL, PRESIDENT VMC VRUNDAVAN GARDEN, KRISHNA BUILD CON CORPORATION, SHOP NO 26/27, DEVASHREE GARDEN COMMERCIAL COMPLEX, NEAR RUTU PARK, RW SAWANT MARG, OPP MAJIWADA FLYOVER, THANE WEST 400601 THANE MAHARASHTRA
3. MR. SANTOSH SAVALARAM PARAB JOINT PRESIDENT VMC VRUNDAVAN GARDEN, KRISHNA BUILD CON CORPORATION, SHOP NO 26/27, DEVASHREE GARDEN COMMERCIAL COMPLEX, NEAR RUTU PARK, RW SAWANT MARG, OPP MAJIWADA FLYOVER, THANE WEST 400601 THANE MAHARASHTRA

जाहीर प्रकटन

वर नमुद तक्रारदार यांनी विरुद्ध पक्ष यांचे विरुद्ध ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुद्ध पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाहीत । पत्ता बदल झालयामुळे मिळून येत नाही, म्हणुन तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस द्वारे आपणास कळविण्यात येते की, विरुद्ध पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्त्यावर दि. १४ July २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता वेळेत स्वतः अगर वकील / प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहुन आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुद्ध पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाद्वारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढिल कार्यवाही करणेत येईल, याची दखल घ्यावी. मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, ठाणे यांचे आदेशानुसार.

ठिकाण:–ठाणे
दिनांक: २८/०६/२०२४

शिक्का

प्रबंधक
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, ठाणे

## राष्ट्रीय गृहनिर्माण बँक

■ जागा : ४८
■ पदाचे नाव तपशील:
१ जनरल मॅनेजर
२ असिस्टंट जनरल मॅनेजर
३ डेप्युटी मॅनेजर
४ असिस्टंट मॅनेजर
५ चीफ इकोनॉमिस्ट
६ सिनियर प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
७ प्रोजेक्ट फायनान्स ऑफिसर
८ प्रोटोकॉल ऑफिसर
९ प्लिकेशन डेवलपर

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: ६०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी SC/ST/PWD: ५५% गुण
पद क्र.५: (i) आर्थिक अर्थशास्त्र किंवा अर्थमिति या विषयातील विशेषीकरणासह अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी. (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १५ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) ICWAI/ICAI/CFA/MBA (Finance) (iii) १० वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) कोणत्याही शाखेतील पदवी (ii) उमेदवार हा भारतातील RBI/PSB/FI मधून निवृत्त अधिकारी असावा आणि वरिष्ठ व्यवस्थापन स्तरावर काम केले पाहिजे. भारतातील RBI/PSB/FIs मध्ये किमान २५ वर्षांचा अनुभव ज्यापैकी किमान ०५ वर्षांचा कामाचा अनुभव पब्लिक रिलेशन/प्रोटोकॉल ड्युटी क्षेत्रात असावा.
पद क्र.९: (i) B.E.(CS/IT)/B.Tech. (CS/IT)/ MCA/M.Tech (CS/IT)/B.Sc.(CS/IT)/ M.Sc. (CS/IT) (iii) ०२ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ०१ जुलै २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: ६२ वर्षांपर्यंत
पद क्र.२: ४० ते ५५ वर्षे
पद क्र.३: ३२ ते ५० वर्षे
पद क्र.४: २३ ते ३२ वर्षे
पद क्र.५: २१ ते ३० वर्षे
पद क्र.६: ४० ते ५९ वर्षे
पद क्र.७: ३५ ते ५९ वर्षे
पद क्र.८: ५० ते ६२ वर्षे
पद क्र.९: २३ ते ३२ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 850/- SC/ST/PWD: 175/-
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: १९ जुलै २०२४
परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://www.nhb.org.in/

## भंडारा ऑर्डनन्स फॅक्टरी

■ जागा : १५८
■ पदाचे नाव तपशील:
१ कार्यकाळ आधारित DBW (डेंजर बिल्डिंग वर्कर) १५८
■ शैक्षणिक पात्रता: AOCP ट्रेड (NCTVT) चे माजी प्रशिक्षणार्थी ज्यांना ऑर्डनन्स फॅक्टरी प्रशिक्षण / लष्करी दारूगोळा आणि स्फोटकांच्या निर्मिती आणि हाताळणीचा अनुभव आहे. आणि पूर्वीच्या आयुध निर्माणी मंडळाच्या आयुध कारखान्यांमध्ये प्रशिक्षण घेतलेले AOCP ट्रेडचे एक्स-ट्रेड अप्रेंटिस. किंवा NCTVT (आता NCVT) द्वारे जारी केलेले NAC/NTC प्रमाणपत्र असलेले उमेदवार आणि सरकारशी संलग्न असलेल्या सरकारी/खाजगी संस्थेकडून AOCP ट्रेडमध्ये आणि सरकारी ITI मधून AOCP असलेले उमेदवार विचारात घेतले जातील.
■ वयाची अट: १५ जुलै २०२४ रोजी १८ ते ३५ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: भंडारा
■ फी : फी नाही.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Chief General Manager, Ordnance Factory Bhandara District: Bhandara Maharashtra, Pin-441906
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ जुलै २०२४
■ अधिकृत वेबसाइट https://ddpdoo.gov.in/units/OFBA

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ Total: १७७२७ जागा
■ परीक्षेचे नाव: SSC संयुक्त पदवीधर स्तर परीक्षा २०२४
■ पदाचे नाव तपशील:
१ असिस्टंट सेक्शन ऑफिसर
२ असिस्टंट/असिस्टंट सेक्शन ऑफिसर
३ इस्पेक्टर ऑफ इनकम टॅक्स
४ इन्स्पेक्टर
५ असिस्टंट एनफोर्समेंट ऑफिसर
६ सब इंस्पेक्टर
७ एक्झिक्युटिव असिस्टंट
८ रिसर्च असिस्टंट
९ डिविजनल अकाउंटेंट
१० सब इंस्पेक्टर (CBI)
११ सब इंस्पेक्टर/जुनियर इंटेलिजन्स ऑफिसर
१२ कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी
१३ ऑडिटर
१४ अकाउंटेंट
१५ अकाउंटेंट /ज्युनियर अकाउंटेंट
१६ पोस्टल असिस्टंट / सॉर्टिंग असिस्टंट
१७ वरिष्ठ सचिवालय सहाय्यक / उच्च श्रेणी लिपिक
१८ सिनियर एडमिन असिस्टंट
१९ कर सहाय्यक
२० सब-इस्पेक्टर (NIA)
■ शैक्षणिक पात्रता:
कनिष्ठ सांख्यिकी अधिकारी: पदवी व १२वीत गणितामध्ये किमान ६०% गुण किंवा सांख्यिकीसह कोणत्याही विषयात पदवी.
■ उर्वरित पदे: कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: ०१ ऑगस्ट २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: २० ते ३० वर्षे, १८ ते ३० वर्षे
पद क्र.२, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, ११: १८ ते ३० वर्षे
पद क्र.१०: २० ते ३० वर्षे
पद क्र.१२: १८ ते ३२ वर्षे
पद क्र.१३ ते २०: १८ ते २७ वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २४ जुलै २०२४ (११:०० PM²)
Tier I परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
Tier II परीक्षा: डिसेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://ssc.gov.in/

## हिंदुस्तान कॉपर लिमिटेड

■ Total: ५६
■ पदाचे नाव तपशील:
ज्युनियर मॅनेजर माइनिंग
इलेक्ट्रिकल
कंपनी सेक्रेटरी
फायनान्स
HR
■ शैक्षणिक पात्रता: माइनिंग/इलेक्ट्रिकल डिप्लोमा + ०५ वर्षे अनुभव किंवा माइनिंग/इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी+ ०२ वर्षे अनुभव किंवा पदवीधर+ ०५ वर्षे अनुभव/CA किंवा PG पदवी/ डिप्लोमा(Finance/HR) PG MBA (Finance/HR) + ०२ वर्षे अनुभव
■ वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी १८ ते ४० वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: कोलकाता
■ Fee: General/OBC/EWS: ५००/- SC/ST: फी नाही
■ महत्त्वाच्या तारखा:
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: २१ जुलै २०२४
■ वेबसाईट https://www.hindustancopper.com/

# झटपट वजन कमी करण्यासाठी उच्च तीव्रतेचा व्यायाम केल्यामुळेही वाढू शकतं वजन? तज्ज्ञ काय सांगतात

आता वाढत्या वजनानं त्रस्त झालेले लोक जिममध्ये जाऊ लागले आहेत. मग झटपट वजन कमी करण्यासाठी उच्च तीव्रतेचा व्यायाम करणं योग्य आहे का?


वजन वाढणे ही आजकाल सर्वांत मोठी आरोग्य समस्या आहे. वाढलेले वजन अनेकांची डोकेदुखी झाली आहे. त्यामुळे तुम्हाला विविध आजार जडतात, लठ्ठपणा वाढल्यास उच्च रक्तदाब, कंबरदुखी, हृदयाचे आजार, गुडघेदुखी यांसारख्या आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी लोक डायटिंग करतात किंवा तासन् तास जिममध्ये घाम गाळतात; परंतु तरीही वजन कमी होत नाही. खरं तर वजन कमी करताना नकळत आपल्याकडून होणाऱ्या चुकांमुळेसुद्धा वजन वाढतं.

आता वाढत्या वजनानं त्रस्त झालेले लोक जिममध्ये जाऊ लागले आहेत. अशा वेळी जर कोणी झटपट वजन कमी करण्यासाठी गरजेपेक्षा जास्त व्यायाम करीत असेल, तर ते आरोग्यासाठी फायदेशीर आहे का? वजन कमी करण्यासाठी व्यायाम करणं हे चांगलं आहे हे आपल्या सर्वांनाच माहीत आहे. पण, गरजेपेक्षा जास्त व्यायाम केल्यानं तुमचं वजन वाढू शकतं का? उच्च तीव्रतेच्या व्यायामामुळे वजन वाढू शकतं का? याच विषयावर AASRA हॉस्पिटल्सचे वैद्यकीय संचालक डॉ. जगदीश जे. हिरेमठ यांनी याबाबत माहिती दिल्याचं वृत्त दी इंडियन एक्स्प्रेसनं दिलं आहे. आपण त्याबाबत सविस्तर जाणून घेऊ.

फिटनेस मिळविण्यासाठी आरोग्यदायी आहारासोबत रोजचा व्यायामही महत्त्वाचा असतो; पण विचार न करता, व्यायाम केल्यास तोही आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो. व्यायामशाळेमध्ये वजन उचलून वजन कमी करण्याचा किंवा तंदुरुस्त राहण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना अनेकदा शंका असते की, जड वजन उचलून व्यायाम करणं योग्य आहे की नाही?

जपानमधील सुकुबा विद्यापीठातील इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ अ‍ॅण्ड स्पोर्ट्स सायन्सेसचे प्रमुख संशोधक ताकाशी मात्सुई, पीएचडी यांनी मेडिसिन अ‍ॅण्ड सायन्स इन स्पोर्ट्स अ‍ॅण्ड एक्सरसाइजमध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासाचे प्रमुख निष्कर्ष मेडिकल न्यूज टुडेकडे स्पष्ट केले आहेत. त्यानुसार, आमच्या अभ्यासात असं आढळून आलं आहे की, वजन कमी करण्यासाठी व्यायाम ही एक शक्तिशाली रणनीती आहे; परंतु उच्च तीव्रतेच्या व्यायामामुळे जास्त घाम येतो. त्यानंतरच्या शारीरिक हालचाली आणि मुख्य शरीराचं तापमान लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतं; ज्यामुळे वजन वाढतं. विशेष म्हणजे वजन वाढण्याची ही स्थिती अन्नाच्या सेवनात कोणताही बदल न झाल्यासही उद्भवते.

तर दुसरीकडे AASRA हॉस्पिटल्सचे वैद्यकीय संचालक डॉ. जगदीश जे. हिरेमठ म्हणतात की, उच्च तीव्रतेचा व्यायाम (HIE) काही विशिष्ट परिस्थितीत शरीराचं वजन वाढण्यास कारणीभूत ठरू शकतो. जसं तुम्ही पुरेशी झोप न घेता, उच्च तीव्रतेचा व्यायाम करीत असाल, तर त्यामुळे तुमच्या आरोग्याबरोबरच तुमच्या वजनावरसुद्धा दुष्परिणाम होऊ शकतो. उच्च तीव्रतेचा व्यायाम फक्त वजनच वाढवत नाही, तर अनेक प्रकारच्या आरोग्याच्या समस्या उद्भवण्यासाठीही



# अभिनेत्री दिव्या दत्ताने एकाच वेळी साईन केलेले २२ चित्रपट



**पडद्यावर दिसणाऱ्या कलाकारांचे आयुष्य, त्यांच्यासोबत घडलेले प्रसंग, कलाकारांनी संकटांवर कशी मात केली, ते त्यांच्या घरात कसे राहतात व वागतात याविषयी चाहत्यांना खूप उत्सुकता असते. कलाकारदेखील आपल्या खासगी आयुष्यातील अनेक महत्त्वाच्या गोष्टी, प्रसंग वेळोवेळी सोशल मीडिया अथवा मुलाखतींच्या माध्यमातून चाहत्यांना सांगत असतात, त्यांच्याबरोबर शेअर करीत असतात. आता अभिनेत्री दिव्या दत्ताने आपल्या करिअरसंबंधित एक महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे.**

नुकत्याच सिद्धार्थ कननला दिलेल्या मुलाखतीत तिने म्हटले आहे की, माझ्या करिअरमध्ये असा एक काळ आला होता की, जेव्हा मी एकदम २२ चित्रपट साइन केले होते आणि त्यानंतर मी आदित्य चोप्राला भेटण्यासाठी गेले होते. 'आजा नच ले' चित्रपटाच्या आधी की नंतर हे मला फारसे आठवत नाही. आदित्यने मला विचारले, 'काय झालं?' मी त्याला सांगितलं की, मी २२ चित्रपट करीत आहे. मला वाटले हे ऐकून त्याला आनंद होईल आणि तो माझ्या पाठीवर कौतुकाची थाप देईल. पण, त्याने काहीच प्रतिक्रिया दिली नाही. तिथे फक्त शांतता होती. त्याच्या अशा गप्प राहण्याने मी कोड्यात पडले.

मला प्रश्न पडला की, जवळजवळ मी दोन डझन चित्रपट साइन केल्यानंतरही आदित्यने मला शुभेच्छा का दिल्या नाहीत. मला त्यामागचे कारण जाणून घ्यायचे होते आणि त्यामुळे मी त्याला विचारले की, तू आनंदी नाहीस का? त्याने मला विचारले, तुला पैशांची गरज आहे का? मी म्हटलं, नाही. मग तू इतके चित्रपट का करते आहेस?

आदित्यने विचारलेल्या त्या प्रश्नानंतर मी आत्मपरीक्षण करायला सुरुवात केली आणि स्वत:बद्दल विचार करायला लागले, मी इतके चित्रपट का करते आहे? मला जाणवले की, जेव्हा जेव्हा मला एखाद्या चित्रपटाची ऑफर आली तेव्हा तेव्हा मला चांगले वाटले. इंडस्ट्रीमध्ये मला मागणी आहे, असे वाटायचे. मी याआधी ज्या नकारांचा सामना केला होता, त्याऐवजी मी जवळजवळ जास्त भरपाई करीत होते. त्यामुळे मी २२ चित्रपट साइन केले होते, असे दिव्या दत्ताने म्हटले आहे. हळूहळू मला ज्या गोष्टींमध्ये मनापासून आनंद मिळतो, त्या गोष्टी निवडायला मी सुरुवात केली आणि त्यानंतर माझ्या करिअरमध्ये अनेक बदल झाले. दिव्या दत्ताने 'इश्क में जीना इश्क में मरना' चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले होते. दिव्या शेवटची ताहिरा कश्यप दिग्दर्शित 'शर्माजी की बेटी'मध्ये परवीन दाबास आणि साक्षी तन्वरसोबत दिसली होती.

# UPSC ची तयारी: भारतीय समाज आणि सामाजिक प्रश्न

**यूपीएससी ने हा घटक अभ्यासक्रमाचा भाग म्हणून का समाविष्ट केला आहे?**

यूपीएससीच्या मुख्य परीक्षेच्या अभ्यासक्रमात 'भारतीय समाज आणि सामाजिक प्रश्न' या घटकाचा समावेश ऋड पेपर १ मध्ये केला आहे. हा घटक स्पर्धकांना भारतीय समाजातील विविध समस्या आणि त्यांचे निराकरण याबाबत जागरूक करतो. तसेच, हा घटक समाजातील विविध घटकांमधील समता, न्याय, सहअस्तित्व आणि सामाजिक सक्षमीकरण यांचे महत्त्व अधोरेखित करतो.



## अभ्यासक्रमातील विषय

यूपीएससीच्या सामान्य अध्ययन पेपर १ मधील 'भारतीय समाज आणि सामाजिक प्रश्न' या घटकांत खालील विषयांचा समावेश आहे:

**भारतीय समाजाची मूलभूत गुणवैशिष्ट्ये :**
भारतीय समाजात विविधता आणि एकता यांचा सुंदर संगम दिसतो. विविध भाषाभाषिक, धर्म, संस्कृती, जात आणि प्रांतीयता यांच्या मिश्रणाने समाजाची संरचना होते. भारतीय समाजाचे मूलभूत गुण म्हणजे बहुसांस्कृतिकता, सहिष्णुता आणि विविधतेमध्ये एकता.

**समाजातील विविधता :** भारतीय समाजात धार्मिक, भाषिक, जातीय, प्रादेशिक आणि आर्थिक विविधता मोठ्या प्रमाणात आढळते. ही विविधता भारतीय समाजाची संपत्ती आहे, जरी ती कधी कधी सामाजिक समस्या निर्माण करू शकते. विविधतेचा अभ्यास करताना त्याचा सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक प्रभाव समजून घेणे आवश्यक आहे.

**महिलांचे वर्तमानकालीन प्रश्न :** महिलांच्या संदर्भात लैंगिक भेदभाव, कौटुंबिक हिंसा, शिक्षणाचा अभाव आणि कामाच्या ठिकाणी असमानता यासारख्या अनेक प्रश्न उद्भवतात. महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध सरकारी योजना आणि कायदे कार्यान्वित आहेत, ज्यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

**लोकसंख्या, दारिद्र्य आणि विकासाच्या मुद्द्यांमधून उद्भवणारे प्रश्न :** भारताची लोकसंख्या वेगाने वाढत आहे, ज्यामुळे संसाधनांची कमतरता, दारिद्र्य, बेरोजगारी, आणि आरोग्याच्या समस्या निर्माण होतात. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शासकीय धोरणे आणि उपाय योजनांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**नागरीकरणाची समस्या आणि उपाय :** नागरीकरणामुळे झोपडपट्टींची वाढ, वाहतूक समस्या, आणि प्रदूषण यासारख्या समस्या निर्माण होतात. या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शहरी नियोजन, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थापन, आणि स्वच्छतेच्या उपाययोजनांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**जागतिकीकरणाचे भारतीय समाजावर होणारे परिणाम :** जागतिकीकरणामुळे भारतीय समाजात आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक बदल घडून येतात. आर्थिक क्षेत्रात रोजगाराच्या संधी वाढल्या असल्या तरी, विषमता वाढली आहे. सांस्कृतिक क्षेत्रात पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव वाढला आहे, ज्यामुळे पारंपारिक मूल्यांवर परिणाम होतो.

**सामाजिक सक्षमीकरणाचे मुद्दे:** समाजातील दुर्बल घटकांना सक्षम करण्यासाठी विविध सरकारी योजना आणि कायदे आहेत. सामाजिक सक्षमीकरणासाठी शिक्षण, रोजगार, आरोग्य, आणि सामाजिक सुरक्षा योजना महत्त्वाच्या आहेत.

**जातिवाद, प्रादेशिकता आणि धर्मनिरपेक्षता यासंबंधी मुद्दे :** भारतीय समाजात जातिवादाचे प्रचलन अद्यापही आहे, ज्यामुळे सामाजिक असमानता निर्माण होते. प्रादेशिकतेमुळे राज्यांमध्ये तणाव निर्माण होऊ शकतो. धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वावर आधारित भारतीय संविधान समाजातील सर्व घटकांना समान वागणूक देण्याचा प्रयत्न करते.

वरील सर्व विषयांच्या सखोल अभ्यासाने स्पर्धकांना भारतीय समाजाची समज येईल आणि विविध सामाजिक प्रश्नांच्या निराकरणासाठी प्रभावी उपाययोजना सुचवता येतील.

### GS १ मध्ये 'समाज' घटकावर विचारण्यात येणाऱ्या प्रश्नांचे गुण

यूपीएससीने 'भारतीय समाज आणि सामाजिक प्रश्न' या घटकावर मागील काही वर्षांमध्ये किती गुणांचे प्रश्न विचारले आहेत, हे खालील तक्त्यामध्ये दिले आहे :
वरील तक्त्यांनुसार, समाज भागावर दरवर्षी साधारणपणे ६० ते १०० गुण विचारले जातात.

**अभ्यास पद्धती –** NCERT च्या पुस्तकांमधील स्थिर भाग आणि चालू घटनांमधील परिवर्तनशीलता.

**स्थिर भागाचा अभ्यास :** भारतीय समाज आणि सामाजिक प्रश्नाच्या स्थिर भागाचा अभ्यास करण्यासाठी NCERT च्या समाजशास्त्र विषयक पुस्तकांचा आधार घ्यावा. या पुस्तकांमध्ये भारतीय समाजाची रचना, समाजातील विविधता, सामाजिक समस्या, आणि त्यांच्या उपाययोजना यांचा सखोल अभ्यास दिला आहे. काही महत्त्वाची छउएठढ पुस्तकं पुढीलप्रमाणे आहेत:

**भारतीय समाज (Indian Societ) – इयत्ता १२ वी, NCERT**

भारतामध्ये सामाजिक बदल आणि विकास ( **Social Change and Development in India**) इयत्ता १२ वी, NCERT भारतीय समाजाची ओळख (महाराष्ट्र बोर्ड)

मासिके आणि वर्तमानपत्रे : योजना, कुरुक्षेत्र मासिक (मराठी आवृत्ती): सरकारी योजनांची आणि सामाजिक प्रश्नांची सखोल माहिती मिळविण्यासाठी उपयुक्त आहे.

राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय दैनिके: द हिंदू, इंडियन एक्स्प्रेस, लोकसत्ता या सारखी वर्तमानपत्रे वाचावीत. विशेषत: संपादकीय पृष्ठे आणि सामाजिक प्रश्नांवरील लेख अभ्यासावेत.

चालू घटनांचा अभ्यास: सामाजिक प्रश्नांच्या परिवर्तनशीलतेचा अभ्यास करण्यासाठी चालू घडामोडींचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी नियमितपणे विविध वर्तमानपत्रे, मासिके, आणि सरकारी अहवाल वाचावेत.

**निष्कर्ष –** भारतीय समाज आणि सामाजिक प्रश्नांच्या अभ्यासाचा यूपीएससी CSE GS पेपर १ च्या तयारीत महत्त्वाचा वाटा आहे. या घटकाच्या अभ्यासासाठी स्थिर भागासाठी छउएठढ च्या पुस्तकांचा वापर आणि चालू घटनांच्या अभ्यासासाठी विविध स्रोतांचा वापर करणे आवश्यक आहे. तसेच, या विषयाच्या सखोल अभ्यासाने स्पर्धकांना समाजातील विविध प्रश्नांची समज येईल आणि त्यांच्या निराकरणासाठी प्रभावी उपाययोजना सुचवता येतील.

महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !





'रक्तदान श्रेष्ठदान ! धर्म जातींच्या पलीकडचे पुण्यदान' याची प्रचिती देणाऱ्या डॉ. राजेश मढवी फाऊंडेशन व रोटरी क्लब ऑफ ठाणे मीडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# रक्तदान शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद

ठाणे – डॉ. राजेश मढवी फाऊंडेशन व रोटरी क्लब ऑफ ठाणे मीडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे स्टेशन सॅटीस पुलाखाली यंदा नव्या वर्षात भव्य असे रक्तदान शिबिर संपन्न झाले. स्व. वसंतराव डावखरे रिक्शा युनियनचे मोलाचे सहकार्य या शिबिरास लाभले. ठाण्यातील नामांकित नवजीवन ब्लड बँकेच्या वतीने रक्त करण्यात आले. सदर रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अंदाजे १०० च्या वर रक्तदान त्यांनी रक्तदान केले. विशेष म्हणजे रक्तदानासाठी जाती-धर्माचे बंधन नसते असे पुण्य कर्म त्या सर्वपलीकडे असल्याची प्रचिती आज आली. सदर कार्यक्रमास भाजपा शहर अध्यक्ष संजय वाघुले,रिक्षा युनियन अध्यक्ष राजू सावंत,मा.नगरसेविका प्रतिभा मढवी, निशिकांत महांकाळ , पोलीस इन्स्पेक्टर भालचंद्र तरे ,राजेंद्र गोसावी आदी मान्यवर उपस्थित होते. शिबीरासाठी सर्वांचे भाजपा उपाध्यक्ष डॉ. राजेश मढवी फाऊंडेशन व रोटरी ठाणे मीडटाऊन चे अध्यक्ष गौरव कांडलकर यांनी आभार मानले.

## जीमखाना रस्त्यावरील वस्तीमध्ये तीव्र पाणी टंचाई

# रहिवाशांचे डोंबिवली एमआयडीसी कार्यालयात ठिय्या आंदोलन

**डोंबिवली – डोंबिवली एमआयडीसीतील सागर्ली–जीमखाना रस्त्यावरील आरई मालिकेतील बंगले, सोसायट्यांमध्ये गेल्या आठवड्यापासून एमआयडीसीकडून पाणी पुरवठा होत नाही. एमआयडीसी अधिकारी या पाणी टंचाईकडे दुर्लक्ष करत आहेत. त्याच्या निषेधार्थ एमआयडीसीतील रहिवाशांनी गुरुवारी सकाळी एमआयडीसीच्या डोंबिवली कार्यालयात ठिय्या आंदोलन केले.**

डोंबिवली जीमखाना रस्त्यावरील आरई मालिकेतील सोसायट्या, बंगल्यांमध्ये मागील आठ दिवसांपासून पाणी पुरवठा होत नसल्याने रहिवाशांनी एमआयडीसी डोंबिवली विभागाचे कार्यकारी अभियंता

> मागील आठ दिवसांपासून डोंबिवली जीमखाना रस्त्यावरील आरई मालिकांमधील सोसायट्या, बंगल्यांमध्ये पाणी नाही. एमआयडीसीकडे वारंवार तक्रारी करूनही अधिकारी त्याची दखल घेत नाहीत. दररोज टँकर मागवून रहिवासी पाण्याची तहान भागवत आहेत. भर पावसात कृत्रिम पाणी टंचाई करून रहिवाशांना त्रास देण्याचा हा प्रकार सुरू आहे.
>
> – शैला कदम, रहिवासी.

शंकर आव्हाड यांची भेट मागितली होती. गुरुवारी सकाळी एमआयडीसीतील रहिवासी सकाळी साडे दहा वाजता एमआयडीसी कार्यालयात पोहोचले. त्यावेळी कार्यालयात शुकशुकाट होता. एकही अधिकारी, कर्मचारी जागेवर नव्हता. अधीक्षक अभियंता भूषण हर्षे, कार्यकारी अभियंता आव्हाड, इतर अधिकारी, कर्मचारी वर्ग कार्यालयात उपस्थित नसल्याने रहिवाशांनी संताप व्यक्त



केला. एक दुय्यम दर्जाचा अधिकारी रहिवाशांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे न देता उडवाउडवीची उत्तरे देत होता. त्यामुळे रहिवाशांचा संताप अनावर झाला.

मागील आठवड्यापासून घरात पाणी येत नाही. बाहेरून एक टँकर विकत घेण्यासाठी दररोज सुमारे दोन ते अडीच हजार रुपये मोजावे लागतात. दुकानातून पाण्याचा बाटला विकत आणण्यासाठी किती पैसे खर्च करायचे, असे प्रश्न रहिवाशांनी अधिकाऱ्यांसमोर उपस्थित केले. पाण्याचे देयक भरणा करण्याचे चुकले तर तात्काळ नळ जोडणी कापण्याची कारवाई एमआयडीसीकडून केली जाते. मग आठवड्यापासून पाणी नसूनही एमआयडीसी अधिकारी शांत का बसले, असे प्रश्न रहिवाशांनी केले. बहुतांशी महिला, पुरुष कर्मचाऱ्यांनी कार्यालयाला दांडी मारून या आंदोलनात सहभागी होणे पसंत केले होते.

एमआयडीसी अधिकारी ज्या वेळेत पाणी येईल सांगतात ती वेळ कोणालाच सोयीस्कर नाही. एमआयडीसीच्या इतर भागात मुबलक पाणी पुरवठा होत आहे. मग डोंबिवली जीमखानावरील रहिवाशांचे पाणी कोण चोरत आहे. त्याचा शोध घेऊन कारवाई करावी, अशी मागणी रहिवाशांनी केली. एमआयडीसीतील ६० हून अधिक रहिवासी या आंदोलनात सहभागी झाले होते. यामध्ये महिला वर्ग आक्रमक होता.

खासदार, आमदारांना आमच्या पाणी प्रश्नाकडे लक्ष देण्यास वेळ नाही. त्यामुळे आम्हाला ही आक्रमक भूमिका घ्यावी लागली, असे रहिवाशांनी सांगितले. आमच्यावर पोलीस कारवाई केली तरी आम्ही एमआयडीसी कार्यालयातून मुबलक पाण्याचे ठोस आश्वासन अधिकारी देत नाहीत तोपर्यंत उठणार नाही, अशी आक्रमक भूमिका रहिवाशांनी घेतली आहे. टँकर समुहाचे हित साधण्यासाठी ही कृत्रिम पाणी टंचाई केली आहे का? अशी टंचाई यापूर्वी रिजन्सी इस्टेट भागात केली जात होती. तोच प्रकार याठिकाणी सुरू झाला असण्याचा संशय रहिवाशांनी व्यक्त केला.

### कार्यालयात शुकशुकाट

शासकीय कार्यालये सकाळी पावणेदहा वाजता सुरू होतात. परंतु, एमआयडीसी कार्यालयात सकाळचे साडेदहा वाजून गेले तरी अधिकारी, कर्मचारी वर्ग कार्यालयात उपस्थित नव्हता. दोन ते तीन महिला कर्मचारी कोंडाळे करून एके ठिकाणी गप्पा मारत बसल्या होत्या. वरिष्ठ अधिकारी आणि त्यांच्या दालनाबाहेरील कर्मचारी उपस्थित नव्हता, अशा तक्रारी रहिवाशांनी केल्या. अधिक माहितीसाठी एमआयडीसीच्या वरिष्ठांना संपर्क साधला, त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

# पंधरा दिवसांपूर्वी सुरक्षित असलेला फलक पडलाच कसा

पनवेल: पंधरा दिवसांपूर्वी महापालिकेच्या पॅनलवरील अभियंत्यांनी सुरक्षित फलकाचा अहवाल दिला होता. परंतू तीन दिवसांपूर्वी हाच फलक खारघर येथील सेक्टर ३४ मध्ये अमनदूत मेट्रो स्थानकासमोर कोसळला. सुदैवाने यात जिवितहाणी झाली नाही. परंतू एक वाहन आणि बैलगाडीचे नूकसान झाले. या घटनेमुळे पनवेलमध्ये उभ्या असलेल्या इतर फलकांच्या सूरक्षेविषयी चिंता व्यक्त केली जात आहे. पनवेल महापालिका आयुक्तांनी या घटनेनंतर पालिका क्षेत्रातील सर्वच फलकांचे पुन्हा स्ट्रक्चरल ऑडीट करण्याचे आदेश दिले आहेत.

रोनक अ‍ॅड एजन्सी या कंपनीला पनवेल महापालिकेने पालिका क्षेत्रात फलक उभारुन त्यामधून व्यवसाय करण्याचा ठेका दिला आहे. महापालिकेला यामधून महसूली उत्पन्न मिळते. परंतू महापालिका क्षेत्रातील हे फलक जिवघेणे ठरतात का अशी चर्चा नागरिकांमध्ये सूरु आहेत. खारघर सेक्टर ३४ येथे रस्त्यालगत लावलेला एक भव्य फलक सोमवारी खाली कोसळला. काही दिवसांपूर्वी घाटकोपर येथे भव्य फलक कोसळून मोठी जिवितहानी झाली होती. त्या घटनेच्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेने पालिका क्षेत्रातील सर्व परवाने दिलेल्या फलकांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून नंतर परवाने दिले जातील अशी घोषणा केली. हे ऑडीट मुंबईचे आयआयटी संस्थेकडून करण्याचा मानस महापालिका प्रशासकांनी व्यक्त केला होता. त्यानंतर महापालिकेच्या पॅनलवर असणाऱ्या अभियंत्यांकडून हे ऑडीट करण्याचे ठरले. पालिकेच्या पॅनलवर असणा–या स्ट्रक्चरल ऑडीटर शिवाजी सरोदे या अभियंत्यांनी खारघर येथे कोसळलेल्या फलकाच्या सूरक्षेबाबत ऑडीट केले होते. हा फलक सुरक्षित असल्याचा अहवाल अभियंते सरोदे यांनी पालिकेला १५ जूनला सुपुर्द केल्याची माहिती पालिकेचे उपायुक्त मारुती गायकवाड यांनी दिली. परंतू सुरक्षित असणारा फलक पंधरा दिवसात कोसळला कसा असा प्रश्न सामान्यांकडून विचारला जात आहे. स्ट्रक्चरल ऑडीट करणारा अभियंता सरोदे यांनी नेमकी कोणती तपासणी केली याविषयी साशंकता व्यक्त केली जात आहे.

या घटनेनंतर पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी पालिका क्षेत्रातील सर्वच फलकांचे पुन्हा स्टक्चरल ऑडिट करण्याच्या सूचना दिल्या आहेत. आयुक्त चितळे यांनी शहरातील सर्व फलकांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी कठोर पावले पालिका उचलत असल्याचे म्हटले आहे.

# शिवसेनेचा मुरबाड मतदारसंघावर दावा, वरिष्ठ नेत्यांकडून दावेदारीसाठी वरिष्ठांकडे साकडे

**बदलापूरः भिवंडी लोकसभा मतदारसंघात केंद्रीय मंत्री कपील पाटील यांचा झालेला पराभव आणि त्यानंतर भाजपच्या दोन वरिष्ठ नेत्यांमुळे पक्षात पडलेल्या फुटीमुळे भाजपाची पिछेहाट होत असल्याचे चित्र असतानाच आता मुरबाड विधानसभा मतदारसंघावर चक्क शिवसेनेने दावा सांगितला आहे. नुकत्याच झालेल्या पदाधिकारी बैठकीत शिवसेनेची बदलापूर शहर, ग्रामीण भाग आणि मुरबाड तालुक्यात असलेली ताकद पाहता शिवसेनेसाठी हा मतदारसंघ सोडावा अशी मागणी वरिष्ठांकडे करणार असल्याचा सूर नुकत्याच झालेल्या या बैठकीत उपस्थितांनी लावला. त्यामुळे महायुतीत वादाची ठिणगी पडण्याची शक्यता व्यक्त होते आहे.**

भिवंडी लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे सुरेश म्हात्रे निवडून आल्यानंतर भाजपला मोठा धक्का बसला. यात मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांच्याविरोधात खुद्द कपिल पाटील यांनीच आरोपांची राळ उठवली. तर भिवंडी तालुक्यात ज्या भागात शिवसेनेचा प्रभाव आहे त्या भागात शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रचार केला नसल्याचा आरोप करण्यात आला. त्यानंतर झालेल्या कोकण पदवीधर निवडणुकीतही शिवसेना आणि भाजपात प्रचारात कुबरबुरी पहायला मिळाल्या. भाजपच्या नेत्यानी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेताच प्रचार केल्याने शिवसेनेचे नेते दुखावल्याची चर्चा आहे. निरंजन डावखरे यांच्या विजयामुळे या वादावर पडदा पडला. मात्र मुरबाड विधानसभा मतदारसंघातील मोठा भाग असलेला कुळगाव बदलापूर नगरपालिकेचा भाग, अंबरनाथ पंचायत समिती, जिल्हा परिषदचे सदस्य तसेच मुरबाड नगर पंचायत, कल्याण आणि ग्रामीण भागात शिवसेनेची ताकद आहे. याच ताकदीवरून आता शिवसेनेने या मुरबाड मतदारसंघावर दावा सांगण्यास सुरूवात केली आहे.

नुकत्याच बदलापुरात झालेल्या पदाधिकारी बैठकीत शिवसेनेच्या सर्वच महत्वाच्या पदाधिकाऱ्यांनी मुरबाड मतदारसंघ शिवसेनेला मिळावा असा सूर लावला. गेल्या तीन विधानसभा निवडणुकीत शिवसेनेची ताकद पहायला मिळाली असे पदाधिकाऱ्यांचे म्हणणे होते. यात २०१९ विधानसभेच्या निवडणुकीत कथोरे यांना शिवसेनेमुळे १ लाख ७४ हजार मतांचा पल्ला गाठता आला. तर २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत गोटीराम पवार आणि वामन म्हात्रे यांना अनुक्रमे ५९ हजार आणि ५३ हजार मते मिळाली. त्या निवडणुकीत कथोरे हे ८५ हजार मते मिळवून विजयी झाले. आता गोटीराम पवार यांचे पुत्र सुभाष पवार आणि वामन म्हात्रे शिवसेनेत आहेत. त्यामुळे ही मते शिवसेनेची एकत्र असून आता शिवसेनेची ही ताकद वाढली आहे. त्यामुळे ही जागा शिवसेनेला देण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली जाईल, असा ठरावही या बैठकीत करण्यात आला. या मागणीमुळे आता मुरबाड विधानसभा मतदारसंघात भाजप आणि शिवसेनेत वादाची ठिणगी पडण्याची शक्यता व्यक्त होते आहे.

## संजय केळकर यांच्या वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप

ठाणे – ठाणे शहरातील जनसेवक आमदार संजय केळकर यांच्या वाढदिवसानिमित्त विभागातील १००० ज्येष्ठ नागरिकांना मोफत छत्री वाटप तसेच प्रत्येक ज्येष्ठ नागरिकांना १ किलो साखर वाटपाचा कार्यक्रम रविवार, ०७ जुलै २०२४ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वामी फाऊंडेशन कार्यालय समोर, चंदनवाडी, ठाणे येथे होणार असून जनसेवक आमदार संजय केळकर यांच्या शुभहस्ते होणार आहे. अशी माहिती स्वामी फाऊंडेशन, श्री स्वामी समर्थ महाराज ट्रस्टचे संस्थापक, अध्यक्ष महेश कदम यांनी दिली आहे. तसेच वरील कार्यक्रमास सर्व पत्रकार बंधू भगिनींनी उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# सफाळेतील जेटीचा मार्ग मोकळा

## वन विभागाची जागा सागरी मंडळाकडे वर्ग करण्यास सरकारची परवानगी

पालघर : पालघर जिल्ह्यातील नारंगी (विरार) ते खारवाडेश्री (सफाळे) येथे प्रवासी जलवाहतुकीसाठी जेटी उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. यासाठी लागणारी वनविभागाची जागा सागरी मंडळाकडे वर्ग करण्यास राज्य सरकारने परवानगी दिली आहे. त्यामुळे जेटी व या जेटीकडील पोहोच रस्त्याच्या कामाच्या उभारणीला चालना मिळणार आहे. हे काम पूर्ण होण्यासाठी किमान दीड वर्षाचा कालावधी लागण्याची शक्यता आहे.

शासनाच्या सागरमाला योजनेअंतर्गत पालघर जिल्ह्यातील नारंगी (विरार) ते खारवाडेश्री (सफाळे) येथे प्रवासी जलवाहतुकीसाठी रो-रो जेटी व तत्सम सुविधा करण्याचे काम प्रस्तावित करण्यात आले होते. या प्रकल्पाला २६ ऑक्टोबर २०१७ रोजी १२ कोटी ९२ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. दातिवरेपासून जलसार व खारमेंद्री गावादरम्यान असणाजया खारवाडेश्री या जेटीपर्यंत जाण्यासाठीचा रस्ता (१५ कोटी रुपये खर्च) पूर्ण झाला आहे. या ठिकाणी जेटी लगत वाहनतळासाठी आठ कोटी रुपयांच्या निधीला यापूर्वी मान्यता मिळाली आहे. तर खारवाडेश्री येथे जेटी उभारण्यासाठी २३.६८ कोटी रुपयांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेला राज्य सरकारने १५ मार्च २०२३ रोजी मंजुरी दिली आहे. मात्र जेटीच्या ठिकाणी संरक्षित वनक्षेत्र व चिखलाच्या ४७९० चौरस मीटर क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात होती. त्यामुळे जेटी उभारणीच्या कामात अडथळा निर्माण झाला होता.

वन विभागाची जागा महाराष्ट्र सागरी मंडळाच्या नावावर हस्तांतरित होण्यासाठी तसेच त्या ठिकाणी असणाऱ्या खारफुटीचे योग्य संरक्षण व संवर्धन व्हावे या दृष्टीने किनारपट्टी नियमन क्षेत्र प्राधिकरण (महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ऑथॉरिटी) यांची ६ एप्रिल २०१७ रोजी परवानगी घेण्यात आली होती. त्यानंतर राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरणाने या रो-रो जेटी संदर्भात २ ऑगस्ट २०१७ रोजी मंजुरी दिली. पाठोपाठ वन विभागाने या संदर्भात प्राथमिक अनुमती २२ ऑक्टोबर २०२० रोजी, मुंबई उच्च न्यायालयाने २९ ऑक्टोबर २०२१ रोजी तर सर्वोच्च न्यायालयाने २४ फेब्रुवारी २०२३ रोजी या कामी अनुमती मिळाल्यानंतर वन विभागाची जागा महाराष्ट्र सागरी मंडळ वर्ग करण्यासाठी प्रक्रिया हाती घेण्यात आली होती.

### वेळ व इंधनाची होणार बचत

खारवाडेश्री ते नारंगी हे अंतर ६० किलोमीटरचे असून सर्वसाधारणपणे या कामासाठी दीड तासाचा कालावधी लागत असतो. मात्र हाच प्रवास जलमार्गाने केल्यास दीड किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी १५ ते २० मिनिटांचा कालावधी लागणार असून नारंगी-खारवाडेश्री जेटी कार्यरत झाल्यानंतर पालघर वसई तालुक्यातील नागरिकांच्या प्रवास वेळेत मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे. या जलमार्गामुळे वसई-विरार ते सफाळा-केळवा परिसरात प्रवास करणे सुलभ होणार असून त्यामुळे पर्यटनाला चालना मिळेल अशी शक्यता आहे. पालघर हे जिल्ह्याचे मुख्यालय असून विरार येथून रस्तामार्गे ७० किलोमीटरवर असणारे हे अंतर जलमार्गाने ३० किलोमीटर इतके होईल.

### वसई तालुक्यातील काम पूर्णत्वास

विरारजवळील चिखलडोंगरी (नारंगी) येथे सुमारे आठ कोटी रुपये खर्च करून जेटी उभारण्याचे काम पूर्ण झाले आहे. या जेटीकडून विरार भागात जाण्यासाठी साडेतीन किलोमीटर लांबीचा रस्ता उभारणीसाठी ३० कोटी रुपये खर्च करून काम हाती घेण्यात आले आहे. हे काम अंतिम टप्प्यात असून रो-रो सेवेअंतर्गत वसई तालुक्यातील काम जवळपास पूर्णत्वास आले आहे.

## ठाण्यात वागळे इस्टेट येथे घरात आग-घरातील साहित्य जळाले, स्लॅब-भिंतीला तडे

ठाणे – ठाण्याच्या वागले इस्टेट परिसरातील वाल्मिकी पाडा येथे चाळीतील वन प्लस वन घराच्या तळमजल्यावरील रूममध्ये बुधवारी रात्री ९-१५ वाजण्याच्या सुमारास अचानक लागलेल्या आगीत घरातील साहित्य, कपडे, फ्रिज तसेच टिव्ही जळून खाक झाले. तर घराच्या स्लॅबला व भिंतीला तडे गेले. तर घर धोकादायक स्थितीत आहे. या घटनेत कुणीही जखमी नाही. ठाण्याच्या वागळे इस्टेट येथील वन प्लस वन असलेल्या खोलीच्या तळमजल्यावरील खोलीत अचानक आग लागल्याने घरातील काही साहित्य, कपडे, फ्रिज तसेच टिव्ही जळून नुकसान झाले आहे. तसेच, आगीमुळे घराच्या स्लॅबला व भिंतीला तडेही गेले आहेत. हा प्रकार बुधवारी रात्री सव्वानऊ वाजण्याच्या सुमारास समोर आला. तसेच तासाभराने आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले असून घरातील रहिवाश्यांना नातेवाईकांकडे स्थलांतरित करण्यात आले आहे. घटनास्थळी वागळे अग्निशमन दलाचे जवान आणि आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी धाव घेत, आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्यानंतर तासाभरात आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाले.

# आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी सेक्टर १६ वाशीतील नमुंमपा शाळेची केली अचानक पाहणी

**नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे आरोग्य आणि शिक्षण या विषयांना सर्वाधिक प्राधान्य राहिले असून महानगरपालिका शाळांतील शिक्षणाचा दर्जा गुणवत्तापूर्ण राहील व विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या सुविधांचा दर्जा उत्तम असेल याकडे त्यांचे कटाक्षाने लक्ष आहे. या अनुषंगाने आयुक्तांनी आज सेक्टर १६ वाशी येथील नमुंमपा शाळा क्रमांक २८ मध्ये अचानक भेट देत तेथील कामकाजाची व सेवांची बारकाईने पाहणी केली आणि शाळा व्यवस्थापनामध्ये आमुलाग्र सुधारणा करण्याचे निर्देश दिले. शाळेतील अंतर्गत स्वच्छतेवर नाराजी व्यक्त करीत शाळेपासूनच विद्यार्थ्यांवर स्वच्छतेचे संस्कार होत असल्याने शाळेची अंतर्गत स्वच्छता व परिसर स्वच्छ असणे ही शिक्षकांची जबाबदारी असल्याचे सांगत यामध्ये त्वरित सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले. काही वर्गांमध्ये तसेच गच्चीवर टाकाऊ सामान तसेच बेंचेस कसेही टाकून ठेवण्याचे निदर्शनास आले. त्यांची विल्हेवाट लावून अथवा योग्य प्रकारे व्यवस्थित ठेवून नीटनेटकेपणा राहील याकडे कटाक्षाने लक्ष देण्याचे आयुक्तांनी निर्देशित केले.**

आयुक्तांनी भेट दिलेली सकाळची वेळ विद्यार्थ्यांच्या मध्यान्ह भोजनाची असल्याने मुलांना देण्यात येणारे अन्न आयुक्तांनी स्वत: खाऊन पाहिले व अन्नाच्या दर्जात अधिक सुधारणा करण्याचे आणि त्याकडे दैनंदिन लक्ष ठेवण्याचे निर्देश मुख्याध्यापकांना दिले. अन्न तपासणाऱ्या शिक्षकाच्या नावासह अन्नाच्या दर्जाबाबतची नोंद आहार पुरवठा नोंदवहीत दररोज न चुकता करावी असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना पुरेशा प्रमाणात अन्न उपलब्ध होईल याची काळजी घ्यावी आणि त्यांना ते खाण्यासाठी स्वच्छ व योग्य जागा उपलब्ध करून द्यावी अशाप्रकारे नियोजन करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. विद्यार्थ्यांना भोजन / खाऊ खाण्यासाठी ताटे पुरविण्यात यावीत व ती देखील स्वच्छ असतील याची दक्षता घेतली जावी असे निर्देशीत करण्यात आले. भोजन झाल्यानंतर उरलेले अन्न पुरवठादाराने त्याच दिवशी परत घेऊन जाणे गरजेचे असून अन्न वितरणाची जबाबदारी असणाऱ्या शिक्षकांनी याची विशेष दक्षता घ्यावी अशाही सूचना देण्यात आल्या.

शाळेतील स्वच्छतागृहांचे सुधारणा काम सुरु असल्याचे आयुक्तांच्या निदर्शनास आले. काम सुरू असले तरी स्वच्छतागृहांच्या ठिकाणी आवश्यक स्वच्छता असलीच पाहीजे असे कटाक्षाने सांगत शौचालयांच्या नियमीत स्वच्छतेमधून विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जावी असे आयुक्तांनी स्पष्ट केले.





यावेळी शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या हजेरीपटाचीही आयुक्त महोदयांनी बारकाईने पाहणी केली. शिक्षकांनी आपल्या कामाचे महत्व ओळखावे तसेच शिक्षकांच्या वर्तनाचा व व्यक्तिमत्वाचा परिणाम विद्यार्थ्यांवर होतो हे लक्षात घेऊन जबाबदारीने व आस्थेने काम करावे असेही आयुक्तांनी निर्देशित केले. शाळेच्या वेळापत्रकाचे काटेकोर पालन करणे हे विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षकांनाही बंधनकारक असून शिक्षकांनी शिकवणे व विद्यार्थ्यांना घडविणे हे आपले प्रथम कर्तव्य असल्याचे लक्षात घेऊन त्यादृष्टीने स्वत:च्या क्षमता वाढवाव्यात असे आयुक्तांनी स्पष्ट केले. याकडे केंद्र समन्वयक आणि शिक्षणाधिकारी यांनी लक्ष ठेवण्याचे निर्देशित करण्यात आले.केंद्र समन्वयक यांना नेमून दिलेल्या क्षेत्रातील शाळांच्या व्यवस्थापनावर व तेथील शैक्षणिक गुणवत्तेवर अधिक बारकाईने लक्ष ठेवण्याचे निर्देश देतानाच शिक्षण अधिकारी यांनीही शाळांना भेटी देऊन तेथील व्यवस्थापनाच्या सुनियोजितपणावर नियमीत लक्ष ठेवावे असे आयुक्तांनी स्पष्ट केले व शाळा पाहणीचा अहवाल आजच सादर करावा असे निर्देशित केले.

या शाळा इमारतीत तळमजल्यावर समावेशित शिक्षण दिले जात असून त्याठिकाणी दिव्यांग विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण दिले जात आहे. त्याची माहिती घेत आयुक्तांनी यामध्ये अधिक गुणवत्तापूर्ण काम होण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या इटीसी केंद्राचे मार्गदर्शन घ्यावे असे सूचित केले.

पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर प्राथमिक शाळेचे वर्ग भरत असून तिस–या मजल्यावर माध्यमिक शाळेचे वर्ग भरत आहेत. या दोन्ही मुख्याध्यापकांनी परस्पर समन्वय राखून संपूर्ण शाळा इमारतीतील स्वच्छता आणि इतर सुविधांबाबत दक्ष राहण्याचे निर्देश देत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी नमुंमपा अखत्यारितील सर्व शाळांमध्ये या सूचनांची अंमलबजावणी करावी असे स्पष्ट निर्देश शिक्षणाधिकारी यांना दिले.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१